# आदेश

गृह विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २ ऑगस्ट, २०१९

महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बल अधिनियम.

क्रमांक:- सेप्रनि-१८१८/प्र.क्र.३१३/पोल-५अ, महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बल अधिनियम (१९५१ चा ३८) च्या कलम-२१ (२) (क) आणि त्यानुषंगाने प्रदान करण्यात आलेल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र राज्यातील गृह विभागाच्या अखत्यारीतील पोलीस दलातील "महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष)(सेवाप्रवेश) नियम, २०१२ सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे :-

१. या नियमांना "महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)( दुसरी सुधारणा) नियम, २०१९" असे संबोधण्यात यावे.

२. "महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष) (सेवाप्रवेश) नियम, २०१२ (यात यापुढे याचा निर्देश "मुख्य नियम" असा करण्यात आला आहे.) मधील नियम ३ चा उपनियम (२) (अ) मधील उपखंड (ड) च्यानंतर खालीलप्रमाणे उपखंड समाविष्ट करण्यात येत आहे :-

"(इ) गडचिरोली जिल्हयातील राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, मुख्यालय वडसा देसाईगंज, गडचिरोली मधील सशस्त्र पोलीस शिपाई पदाच्या भरतीमध्ये आवेदन सादर करणाऱ्या उमेदवाराला अतिरिक्त १०० गुणांची गोंडी आणि माडीया भाषेची लेखी चाचणी परीक्षा दयावी लागेल."

"(फ) असे उमेदवार राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, मुख्यालय वडसा देसाईगंज, गडचिरोली मधून १५ वर्ष आंतरगट बदलीपात्र असणार नाहीत."

३. मुख्य नियमामधील नियम ४ चे उपखंड (२) खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे :-

" **(२) शारीरीक चाचणी (१०० गुण)** :- जे उमेदवार लेखी परीक्षेत किमान ३५% (मागास प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत ३३%) गुण मिळवून उत्तीर्ण होतील, त्यांच्यापैकी गुणवत्ता क्रमानुसार, प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद

Scanned by CamScanner

केलेल्या पदसंख्येच्या १ : १० या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना खालीलप्रमाणे शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | ५ कि.मी. धावणे | ...... | ५० गुण |
| (ब) | १०० मीटर धावणे | ...... | २५ गुण |
| (क) | गोळा फेक | ...... | २५ गुण |
| | एकूण | ...... | १०० गुण |

**स्पष्टीकरण** :- जे उमेदवार लेखी चाचणीत किमान ३५% (मागास प्रवर्गातील उमेदवाराबाबत ३३%) गुण मिळवून लेखी परीक्षा उत्तीर्ण होतील, त्यांच्यापैकी गुणवत्ता क्रमानुसार प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १ : १० या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल. उदाहरणार्थ जर अनुसूचित जाती प्रवर्गासाठी १० जागा व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी ५ जागा असतील तर अनुसूचित जाती प्रवर्गातील १००(१०X१०=१००) व अनुसूचित जमाती प्रवर्गातील ५०(५X१०=५०) उमेदवार शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरतील. तथापि, अनुसूचित जाती प्रवर्गातील गुणानुक्रमे १०० व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळालेले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जाती प्रवर्गांतर्गत शारिरीक चाचणीसाठी पात्र असतील. तसेच, अनुसूचित जमाती प्रवर्गातील गुणानुक्रमे ५० व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळालेले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गांतर्गत शारिरीक चाचणीसाठी पात्र असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नावाने,

(व्यं.मा.भट)
शासनाचे उप सचिव.

Scanned by CamScanner

# ORDER

Home Department,
Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai - 400 032
Dated :- 2 August, 2019.

Maharashtra State Reserve Police Force Act.

No. RTR-1818/C.N.313/Pol-5A. - In exercise of the powers conferred by clause (c) of sub-section (2) of section 21 of the Maharashtra State Reserve Police Force Act (XXXVIII of 1951), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Armed Police Constables (Male) in Maharashtra State Reserved Police Force (Recruitment) Rules, 2012, namely :-

1. These rules may be called the Armed Police Constables (Male) in Maharashtra State Reserved Police Force (Recruitment) (Second Amendment) Rules, 2019.

2. The rule 3 of the Armed Police Constables (Male) in Maharashtra State Reserved Police Force (Recruitment) Rules, 2012 (hereinafter referred to as "the Principal Rules"), in sub-rule (2), in clause (A), after sub-clause (d), the following sub-clauses shall be added, namely :-

   "(e) Candidate who apply to the post of Armed Police Constable in State Reserve Police Force Group No 13, Head Quarter Vadsa Desaiganj, Gadchiroli recruitment, shall require to appear in an additional 100 marks written examination of Gondi and Madiya languages.

   (f) These candidates shall not be entitled to transfer outside the State Reserve Police Force Group No 13, Head Quarter Vadsa Desaiganj, Gadchiroli for a period of 15 years."

3. In rule 4 of the Principal Rules 2012, for sub-rule (2), the following sub-rule shall be substituted, namely :-

   "(2) Physical Test (100 marks) :-

   The candidates securing a minimum of 35% marks (33 % marks in respect of Backward Class Category candidates) in the Written Test shall be eligible to be called to appear for a Physical Test of 100 marks in the ratio of 1:10 of vacancies advertised in the respective categories, as follows, namely:-

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | 5 Kilometers running | ... | ... 50 marks |
| (b) | 100 meters running | ... | ... 25 marks |
| (c) | Shot Put | ... | ... 25 marks |
| | Total | ... | ... 100 marks |

**Explanation**:- Candidates securing a minimum of 35% marks ( 33 % marks in respect of Backward Class Category candidates) in the Written Test shall be eligible to be called to appear for a Physical Test in the ratio of 1:10 of the vacancies advertised in the respective categories. If, for example, there are 10 vacancies in the Scheduled Caste Category and 5 vacancies in the Scheduled Tribes Category, then 100 (10 X 10 = 100) candidates will be listed on merit in the Scheduled Caste Category and 50 (5 X 10=50) candidates, will be listed in the Scheduled Tribes category. However, all candidates in the Scheduled Caste Category who have secured the same marks as the Scheduled Caste candidate at the 100rd rank shall be eligible to be called to appear for a Physical Test. Similarly, all Scheduled Tribes Category candidates who have secured the same marks as the Scheduled Tribes candidate ranking 50th will be eligible to be called to appear for a Physical Test".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(V. M. Bhat)
Deputy Secretary to Government.

Scanned by CamScanner